IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# स्वातंत्र्योत्तर भारतातील सुधारणा अणि राष्ट्रनिर्माण

**गणेश नंदू सुपले**

(एम. ए. इतिहास, सेट), इतिहास विभाग

सेवा सदन चे आर. के. तलरेजा महाविद्यालय उल्हासनगर

**Article Info**

*Article History:*
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

**Keywords:**
*स्वातंत्र्योत्तर भारत, सुधारणा, राष्ट्रनिर्माण, पंचवार्षिक योजना, हरित क्रांती, आर्थिक उदारीकरण, औद्योगिकीकरण, सामाजिक विकास, लोकशाही*

**ABSTRACT**

या संशोधन लेखात स्वातंत्र्योत्तर भारतातील विविध सुधारणांबद्दल चर्चा करण्यात आली आहे. ज्या मध्ये भारताने सामाजिक, राजकीय, आर्थिक इत्यादी क्षेत्रांमध्ये आपल्या देशाच्या तत्कालीन परिस्थितीनुसार अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. कारण स्वातंत्र्यानंतर भारतासमोर अंतर्गत समस्या अधिक होत्या त्या सर्व समस्यांचे निराकरण करून आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वतःचे अस्तित्व निर्माण करने हे देखील एक आव्हानात्मक काम होते. अणि ते ही अशा वेळेस ज्या वेळेस जगामध्ये दोन मोठे देश यू.एस.ए आणि यू. एस .एस आर यांच्या मध्ये असलेली सत्ता स्पर्धा की जगाचे नेतृत्व कोण करेल? अशा वेळेस भारताने जागतिक पातळीवर समतोल साधत खूप महत्वपूर्ण सुधारणा घडवून आणल्या उदा. राज्यघटनेची निर्मिती, अलिप्तवादी चळवळ, विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात केलेली प्रगती, पंचवार्षिक योजना, लोकशाही विकेंद्रीकरणासाठी सुरु केलेली पंचायत राज व्यवस्था तसेच काही समकालीन सुधारणा इत्यादी गोष्टींचा तुलनात्मक अभ्यास करून राष्ट्रनिर्मिती मध्ये त्यांचे योगदान कसे राहिले आहे याचे परीणाम अभ्यासले आहे.

*Plagiarism Check Report:*
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Suplae, G. N. (2025). स्वातंत्र्योत्तर भारतातील सुधारणा आणि राष्ट्रनिर्माण. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 1980–1984.

**संशोधन उद्दिष्ट्ये:**

१. स्वातंत्र्योत्तर भारतात राबविण्यात आलेल्या प्रमुख सुधारणा व धोरणांचा अभ्यास करणे.

२. राष्ट्रनिर्माण प्रक्रियेत लोकशाही, आर्थिक विकास, समजिक न्याय यांची भूमिका स्पष्ट करणे.

१. ३.पंचवार्षिक योजना, हरित क्रांती यांचा भारतीय विकासावर झालेला परीणाम अभ्यासणे.

२. ४.शिक्षण, आरोग्य, विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातील धोरणांचे विश्लेषण.

३. ५.सुधारणा व विकास प्रक्रियेच्या माध्यमातून भारताने साधलेल्या प्रगतीचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती:**

सदर संशोधन लेखासाठी पुस्तके, संशोधन लेख, सरकारी वेबसाईट आणि ऐतिहासिक ग्रंथांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच विविध लेखकांचे आधुनिक व समकालीन भारताच्या इतिहासावरील पुस्तकांचा अभ्यास करण्यात आला असून वर्तमानपत्रातील लेखांचा देखील अभ्यास कऱण्यात आला आहे. त्याच प्रमाणे भारताचा अर्थसंकल्प व विविध शासकीय अहवालांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रस्तावना:**

भारत जगाच्या नकाशावर स्वतंत्र देश म्हणून उदयास येण्यापूर्वी ब्रिटिशांची एक वसाहत व गुलामगिरी मध्ये असलेले राष्ट्र म्हणून वावरत होते. ज्यामध्ये भारताचे ब्रिटिशांनी आर्थिकदृष्ट्या खूप शोषण केले होते आणि जेंव्हा भारताने १९४७ मध्ये स्वतंत्र मिळविले तेव्हा भारत अशा पातळीवर होता की भारतामध्ये अशांतता मोठ्या प्रमाणात होती. उदा. सांप्रदायिक वाद, आर्थिक समस्या, प्रादेशिक असमतोल व एकीकरण, सामाजिक विषमता व राजकीय एकीकरण, साक्षरता, गरिबी, पायाभूत सुविधा इत्यादी आणि अशा स्थितीत देशाचे नेतृत्व रष्ट्रनिर्मितीची महान जबाबदारी पेलत होते. आणि भारताला एक धर्मनिरपेक्ष, लोकशाही व प्रगतराष्ट्र बनविण्याचे प्रयत्न सुरू केले व त्यासाठी राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात सुधारणा कार्यक्रम हाती घेण्यात आल्या. या संशोधन लेखात या सर्वांची सखोल मांडणी करण्यात आली आहे.

**मुख्य विवेचन:**

**राजकीय सुधारणा आणि राष्ट्रनिर्मिती:**

स्वातंत्र्यानंतर भारतासमोर सर्वात महत्वाचा प्रश्न असा होता की भारतात कोणत्या प्रकारची राजकीय व्यवस्था स्थापन केली जावी. व देशाचे संविधान कशा प्रकारचे असेल. शेवटी खूप विचार केल्यानंतर व जगभरातील संविधानाचा अभ्यास केल्यानंतर आपल्या घटनाकारांनी संसदीय लोकशाही व्यवस्था स्वीकारली. अणि देशाची लोकशाहीच्या मार्गाने वाटचाल सुरू झाली. आणि आज ७५ वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटला आहे तरी आपला देश यशस्वीरित्या लोकशाही टिकवून आहे. तसेच जग अमेरिका व सोव्हिएत रशिया अशा दोन गटांमध्ये विभागला असता भारताने कोणत्याही एका गटांमध्ये सामील न होता जागतिक पातळीवर स्वतःची अलिप्त राहण्याची ठाम भुमिका मांडली. कोणत्याही सत्ता गटाच्या संघर्षात सामील न होता. अलिप्त राहून वेळोवेळी जागतिक पातळीवर आपली भूमिका भारत आजपर्यंत मांडत आला आहे व मांडतो आहे. तसेच देशाच्या अंतर्गत बाबी मध्ये राज्यांची पुनर्रचना यशस्वी पद्धतीने करून एक संघ भारत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. व त्याद्वारे भाषिक, धार्मिक, सांस्कृतीक सलोखा अबाधित ठेवला आहे.

**सामाजिक सुधारणा:**

स्वातंत्र्यानंतर भारतासमोर ज्या प्रमाणे राजकिय समस्या होत्या त्या प्रमाणेच काही सामाजिक समस्या होत्या. ज्याचे निराकरण करणे भारतासमोर एक मोठे आव्हानच होते. ज्या मध्ये शिक्षणाची स्थिती, समाजातील साक्षरतेचे प्रमाण वाढवणे, जातीभेद, धार्मिक वाद, सांप्रदायिक वाद, स्त्रियांच्या सामाजिक समस्या या सर्व समस्यांचे निराकरण करणे. असे अनेक प्रश्न भारतासमोर होते. परंतु भारताने टप्याटप्याने सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी सुधारणा कार्यक्रम हाती घेतले.ते खालीप्रमाणे

आहेत:

१. प्राथमिक शिक्षणाचा प्रचार प्रसार, साक्षरता मोहीम, सर्व शिक्षा अभियान , राष्ट्रीय शैक्षणीक धोरणे इत्यादी उपाययोजना.

२. जातीभेद दूर करण्यासाठी अस्पृश्यता निवारण सारखे कडक कायदे केले.

३. धार्मिक सलोखा जपण्यासाठी धर्मनिरपेक्षते चे धोरण स्वीकारले.

४. स्त्रियांच्या सामाजिक समस्या दूर करण्यासाठी स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी अनेक कायदे व नियम केले.

उदा. समान कामासाठी स्त्री पुरुष यांना समान वेतन, बालविवाह बंदी, हुंडा प्रतिबंधक कायदा, नोकरीमध्ये सामान संधी इत्यादी. तसेच १९५० मध्ये स्वीकारलेल्या भारतीय संविधानाने, कायद्यासमोर समानतेसह मूलभूत अधिकारांची हमी दिली. शिक्षण, सरकारी नोकऱ्या आणि राजकीय प्रतिनिधित्वात कोटा देऊन अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी आरक्षण धोरणे सुरू करण्यात आली. या उपाययोजनांचा उद्देश ऐतिहासिक भेदभाव दूर करणे आणि सामाजिक गतिशीलता वाढवणे होता. सामाजिक कायदे, भेदभाव करणाऱ्या पद्धतींमध्ये सुधारणा करणे आणि समान हक्क प्रदान करणे, विशेषतः महिला आणि उपेक्षित गटांना लाभदायक ठरणे हे देखील या काळात साध्य करण्याचे प्रयत्न झाले.

**आर्थिक विकास:**

स्वतंत्र भारतासमोर सर्वात महत्वाचा प्रश्न असा होता तो म्हणजे भारताचे आर्थिक धोरण कसे असेल. कारण ब्रिटीश वसाहतवादी धोरणाने भारताची पुर्ण आर्थिक पिळवणूक झाली होती. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर भारताला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनने गरजेचे होते. त्यासाठी भारतासमोर दोन पर्याय होते ते म्हणजे अमेरिका पुरस्कृत भांडवलशाही अर्थव्यवस्था किंवा सोव्हिएत रशिया आधारीत साम्यवादी अर्थव्यवस्था. परंतू भारताने दोन्हीं पैकी एक ही पद्धत पूर्णपणे न स्वीकारता दोन्ही अर्थव्यवस्थेचे समावेश करून नवीन अर्थव्यवस्था स्वीकारली जिला मिश्र अर्थव्यवस्था असे म्हंटले जाते. आणि त्याद्वारे भारताने आपल्या आर्थिक धोरणामध्ये सार्वजनिक क्षेत्राबरोबरच खाजगी क्षेत्राचे ही अस्तीत्व स्वीकारले आहे. आणि खालीलप्रमाणे आर्थिक सुधारणा कार्यक्रम राबवून भारताला आज जगातील पाचवी मोठी अर्थव्यवस्था बनवली आहे.

१. पंचवार्षिक योजना राबवून भारताचा निरंतर व शिस्तबध्द विकास चालू ठेवला.

२. पहिले औद्योगिक धोरण जाहीर केले १९४८ – मिश्र अर्थव्यवस्था स्थापन करण्याचा निर्णय.

३. १९५६ चे औद्योगिक धोरण – समाजवादी समाजरचना स्थापन करण्याचे ठरविले.

४. हरित क्रांती १९६५ – १९६६ – अन्नधान्याच्या बाबतीत देशाला स्वयंपूर्ण बनविले.

५. नवीन औद्योगिक धोरण – उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण या दिशेने भारताची वाटचाल सुरू झाली.

६. राष्ट्रिय उत्पादन धोरण – २०११, मेक इन इंडिया – २०१४, स्टार्ट अप इंडिया – २०१६, वस्तू सेवा कर, आत्मनिर्भर भारत – २०२०. इत्यादी धोरणे राबवून भारताला आर्थिक क्षेत्रांत स्वयंपूर्ण व स्वावलंबन बनवण्याचे प्रयत्न देशाचे नेतृत्व करीत आहेत.

**ग्रामीण विकास:**

भारताच्या सक्षमीकरणासाठी ग्रामीण भागाला दुर्लक्ष करून चालणार नाही हे भरताच्या नेतृत्वाने बरोबर ओळखले आहेत. त्यामुळे भारताचा खरा विकास ग्रामीण भागात आहे हे तत्व लक्षात घेऊन सरकारने ग्रामीण भारतासाठी अनेक राजकिय,सामाजिक,आर्थिक सुधारणा कार्यक्रम हाती घेतले आहेत.ग्रामीण भारताचा राजकिय व सामाजिक तसेच आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी पंचायतराज व्यवस्थेला कायदेशीर स्वरूप देऊन लोकशाही विकेंद्रीकरण ची संकल्पना सुरु केली. तसेच मनरेगा च्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांना १०० दिवसांच्या रोजगाराची तरतूद केली. तसेच ग्रामीण भारताच्या सक्षमीकरणासाठी खालीलप्रमाणे काही उपाययोजना सुरू केल्या:

१. इंदिरा आवास योजना

२. प्रधानमंत्री आवास योजना

३. शेतकऱ्यांसाठी विविध योजना सुरू करून त्यांना सक्षम बनविण्याचे प्रयत्न केले – उदा. प्रधानमंत्री कुसुम योजना, राष्ट्रीय कृषी बाजार, प्रधानमंत्री फसल बीमा योजना इत्यादी
४. प्रधानमंत्री स्वामित्व योजना. इत्यादी विविध योजना राबवून भारताने ग्रामीण भागातील गरिबी व रोजगाराची समस्या सोडवण्याचा यशस्वीरित्या प्रयत्न करत आहे. तसेच शेतकऱ्यांना अर्थसहाय्य सारख्या योजना राबवून त्यांना सक्षम करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**विज्ञान तंत्रज्ञान आणि अवकाश संशोधन:**

तत्कालीन पंतप्रधान पंडीत नेहरू यांनी विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात भारताची प्रगती व्हावी यासाठी प्रयत्न केलेलें होते. तसेच त्यानंतरच्या प्रत्येक पंतप्रधानांनी विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्राच्या प्रगतीकडे विषेश लक्ष दिले होते. त्या सर्वांच्या प्रयत्नातून १९६९ मध्ये इस्रो ची स्थापना करण्यात आली. व आज भारत त्या माध्यमातून मंगळयान, चांद्रयान, गगनयान सारखे मोहिमा राबवून जगामध्ये चर्चेत असणारा देश बनला आहे. व आज भारत जगात अवकाश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पहिल्या ५ देशांमध्ये गणला जात आहे. तसेच अनेक आय. आय. टी ची स्थापना करण्यात येऊन भारताला विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगतशील व स्वावलंबी बनवण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. तसेच भारताने अणूशक्तीची यशस्वी चाचणी करून भारताला आण्विक दृष्ट्या सक्षम बनविले आहे. व आज जगात भारत विश्वासू आण्विक शक्ती देश म्हणून जागतिक पातळीवर पुढे येत आहे.

**परराष्ट्र धोरण:**

भारताने स्वातंत्र्यानंतर आपल्या परराष्ट्र धोरणाला खूप महत्व दिले आहे ज्या मध्ये जागतीक शांततेला चालना देणे, वसाहतवादाला विरोध, वंशभेद विरोध, अलिप्ततावाद, निशस्त्रीकरण इत्यादी गोष्टींना खूप महत्व दिले आहे. तसेच गुजराल सिद्धांत हा भारताच्या परराष्ट्र धोरणातील महत्वाचा टप्पा आहे. देवगौडा सरकारमधील तत्कालीन परराष्ट्रमंत्री आय.के. गुजराल यांनी १९९६ मध्ये हा सिद्धांत मांडला. भारत हा दक्षिण आशियातील सर्वांत मोठा देश असल्याने, भारताने शेजारच्या छोट्या राष्ट्रांना एकतर्फी सवलती द्याव्यात हे तत्व सांगते. वेगळ्या शब्दात सांगायचे तर, भारताने शेजारच्या छोट्या राष्ट्रांना प्रतिसहकार्याची अपेक्षा न ठेवता सांभाळून घेतले पाहिजे, असा या तत्वाचा अर्थ होय. या धोरणाने भारताचे शेजारी राष्ट्रांबरोबर मैत्रीचे व शांततेचे संबंध असणे अत्यंत महत्वाचे मानले आहे. तसेच २०१४ मध्ये भारत सरकारने भारताचे पूर्वाभिमुख धोरण अधिक वृद्धिंगत करून त्याचे पूर्व कृती धोरण असे नामांतर केले. १९९२ मध्ये तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांनी पहिल्यांदा पूर्वाभिमुख धोरण मांडले होते. पूर्व कृती धोरणामध्ये भारताचा ईशान्य भागाला प्राधान्य आहे. या धोरणामध्ये अरुणाचल प्रदेश धरून ईशान्य भारत आणि आसियान क्षेत्रातील सबंध मजबूत व्हावेत अशी आपल्या पूर्वकृती धोरणात तरतूद आहे. अशा प्रकारे भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात शेजारील छोट्या देशांशी शांतता पुर्ण सबंध ठेवून त्यांच्याशी मैत्रीचे संबंध ठेवले आहेत व आशिया खंडामध्ये एक मजबूत व सक्षम देश म्हणून भारत पुढे येत आहे.

**सांस्कृतिक अणि राष्ट्रीय एकात्मता:**

स्वातंत्र्यानंतर भारताने बहुभाषिक व बहुधार्मिक, बहुसांस्कृतिक या देशाला एकसंघ व एकजुटीने ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठीच भारताने वारंवार शांततेचा व धर्मनिरपेक्षतेचे आव्हान केले आहे व आजही करत आहे. तसेच नवी दिल्ली येथे केंद्र सरकारने आयोजित केलेल्या विविधतेतून एकता या विषयावरील राष्ट्रीय परिषदेत ठरविल्याप्रमाणे १९६१ मध्ये राष्ट्रीय एकात्मता परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. तसेच सांप्रदायिक बंधुभाव वाढण्यासाठी राष्ट्रीय प्रतिष्ठानची स्थापना १९९२ मध्ये करण्यात आली आहे. हे प्रतिष्ठान सांप्रदायिक बंधुता आणि एकात्मता याला चालना देते. यासाठी राष्ट्रिय एकात्मता सारखे कार्यक्रम राबविले जात आहेत.

**मुख्य निष्कर्ष:**

१. भारताने स्वातंत्र्यानंतर आज इतक्या वर्षांमध्ये लोकशाही व राष्ट्रीय एकात्मता अबाधित ठेवली आहे.
२. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून भारताला विकासाच्या मार्गावर आणले.
३. हरीत क्रांतीमुळे देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनवण्यात आले.
४. उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरणाचा पुरस्कार करून देशाच्या अर्थव्यवस्थेला जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडले.
५. विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आज भारत ७५% पेक्षा जास्त स्वावलंबी बनला आहे.
६. भारताच्या अलिप्तवादी चळवळीचा यशस्वीरित्या जागतिक पातळीवर प्रसार होत आहे.
७. सांस्कृतिक विविधता असून ही भारताने वसुधैव कुटुंबकम ही संकल्पना जपली आहे.

**निष्कर्ष:**

अशा प्रकारे स्वातंत्र्यानंतर भारताने आपल्यासमोरील अनेक राजकीय, सामाजिक, आर्थिक आव्हानाचा यशस्वीरित्या सामना करून प्रत्येक संकटावर मात करत शेजारील देशांशी शांत व मैत्रीचे धोरण स्वीकारून अंतर्गत व जागतीक पातळीवर भारताला एक कणखर व मजबूत देश अशी ओळख निर्माण झाली आहे. थोडक्यात आजच्या परिस्थितीत भारत जगाच्या नकाशावर एक यशस्वी लोकशाही देश म्हणून पुढे येत आहे. व जगामध्ये यशस्वीपणे विविधतेमध्ये एकता ठेवून आधुनिकतेकडे झेप घेत आहे हा भारताचा मोठा विजय आहे.

**संदर्भ:**

१. स्वातंत्र्योत्तर भारत १९४७ ते २००० – बिपिन चंद्र
२. इंडिया स्ट्रगल फॉर इंडिपेंडंस अँड अफ्टर इंडिपेंडंस – बिपिन चंद्र
३. आधुनिक भारताचा इतिहास ( मराठी आवृत्ती ) – ग्रोव्हर अणि बेल्हेकर
४. इंडीयन पॉलिटी – एम. लक्ष्मीकांत
५. भारतीय अर्थव्यवस्था – रमेश सिंह
६. भारताचा आर्थिक अहवाल २०२४ - २०२५